MHST200001202026

## नि.दि.दा.क्र.७५/२०२६ मधील निशाणी क्र.१६ वरील आदेश

प्रतिवादीने सदरचा अर्ज त्याचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले.

३. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, त्यांना आपली कैफियत व म्हणणे नेमल्या तारखेस दाखल करता आलेले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध विना कैफियतीचा आदेश झालेला आहे. त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

४. वादींनी सदर अर्जावर म्हणणे देवुन असे कथन केले की, प्रतिवादी यांना दि.०७.०४.२०२६ रोजी समन्स / नोटीस रुजू झालेले असुन ते जाणीवपूर्वक, हेतूपुरस्सर विलंब करीत आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

५. सदर दावा जाहीर ठराव होऊन मिळणेबाबत दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. सदर प्रतिवादी यांचेवर दि.०७.०४.२०२६ रोजी समन्सची बजावणी झालेली

आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दि.१३.०७.२०२६ रोजी दिला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देण्यास फारसा विलंब झालेला नाही. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादीविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्विकारण्यात येते.

SATISH BUGANNA GANAPA Digitally signed by SATISH BUGANNA GANAPA Date: 2026.07.29 17:23:36 +0530

स्थळ : वाई. (एस. बी. गणपा)
दिनांक : २९.०७.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.